Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.I/ Feb; 12pp.1-4 राऊत उध्दव उमाजी ISSN:-2230-7850

Research Papers

''वालूरचा ऐतिहासिक वारसाः एक अभ्यास''

राऊत उध्दव उमाजी
एम.ए.एम.फिल.इतिहास
बहिर्जीस्मारक महाविद्यालय,
वसमतनगर. जि. हिंगोली.

प्रस्तावना :–

यादव सत्तेचा प्रभाव वालूर या गावावर प्रचंड प्रमाणात आहे. हे गाव परभणी पासून 45 कि.मी. अंतरावरती पश्चिम दिशेस येते. या गावाची आख्यायिका रामायणकर्ता वाल्मिकीशी आहे. पश्चात्तापदग्ध मनाने वाल्याकोळी तपश्चर्या करीत असतांना त्याच्या अंगावर मुंग्यांचे वारुळ चढले असा समज आहे. बकदाल्भ्य ऋशी आपली तीर्थयात्रा आटोपून या रस्त्याने परत जात असतांना येथे वारुळातून त्यांना मंत्रघोस ऐकावयास आला. त्यांनी वाल्याला वारुळातून बाहेर काढले व त्यास गायत्री मंत्र व चार वेदांचा अधिकार दिला. तेव्हापासून वाल्याकोळी वाल्मिकी ऋशी म्हणून संबोधला जाऊ लागला असे लोक मानतात. या गावात अनेक हेमाडपंती मंदिरे आहेत.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी पुढील संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला. विखुरलेली ज्ञात व अज्ञात माहिती व तिचे स्त्रोत संकलित करण्यासाठी सर्वेक्षण, मुलाखती इ. पध्दती, तसेच विविध संदर्भ ग्रंथाचा आधार घेतला आहे.

हेमाडपंती सिध्देश्वर मंदिर वालूर :

मंदिराची रचना :

सुरुवातीस गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, मुखमंडप असून मंदिर पूर्वाभिमुख आहे. हे मंदिर त्रिदल पध्दतीचे आहे. सिध्देश्वर मंदिर गावाच्या पूर्वेस आहे. हे मंदिर हेमाडपंती शैलीने बांधलेले असून प्रशस्त आहे. मात्र त्याची पडझड होत आहे. मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार पूर्वेकडे आहे1. 'प्रासादमंडन' या ग्रंथात देवालयाचे मुख कोणत्या दिशेस असावे या बद्दल अशी माहिती दिलेली आहे की, देवालय हे पूर्वाभिमुख किंवा पश्चिमाभिमुख असते. तेंव्हा मंडपाच्या मागच्या बाजूला गर्भागार असून पुढे दुसरा मंडप किंवा मुखमंडप असतो. मंडपाच्या फक्त उत्तर व दक्षिण दिशांकडील भिंतीवर देवता मूर्ती असतात. त्याच्या साठीची प्रणाल त्यांच्या डाव्या किंवा उजव्या बाजूस म्हणजे पूर्व किंवा पश्चिम दिशांना करतात2. याच पध्दतीने या मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार आहे.

गर्भगृह :

सिध्देश्वर मंदिराच्या गर्भगृहाचा आकार 3′ X 3′ एवढा आहे. गाभायात मध्यभागी शिवपिंड असून शिवपिंडीचे मुख उत्तर दिशेस आहे. शिवपिंड आकाराने मोठी आहे. या मंदिरास मुळ तीन गाभारे आहेत. आज स्थितीस या गाभायात कोणतीही मूर्ती नाही. परंतु, पूर्वीच्या या दोन्ही गाभायात शिवपिंडी होत्या. दोन शिवपिंडी बाहेर ठेवण्यात आल्या आहेत. गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर ललाटी गणेशाची मूर्ती कोरली आहे.

अंतराळ :

सभामंडप व गाभारा यांच्या मधील दालनास 'अंतराळ' म्हणतात.3 2′x2′ अशा छोट्या आकाराचे हे अंतराळ आहे. अंतराळाच्या उजव्या आणि डाव्या बाजूस देवकोश्ठ आहेत.

सभामंडप :

सिध्देश्वर मंदिराचा सभामंडप 5′x5′ आकाराचा आहे. सभामंडपाच्या दोन्ही बाजूस दोन उपगर्भगृहे आहेत. मात्र आज या दोन्हीही गर्भगृहात कोणतीच मूर्ती व शिवपिंड नाही. सभामंडपाच्या खांबावर कीर्तीमुखे कोरली आहेत. याशिवाय प्रवेशद्वारावरती ललाटी गणेशाची मूर्ती आहे.

मुखमंडप :

मंदिराचे मुखमंडप आजही चांगल्या स्थितीत आहे. त्याचा आकार 5′x5′ एवढा आहे.

मंदिरातील मूर्तीशिल्पे :

सभामंडपाच्या प्रवेशावर जय विजय कोरली आहेत. हे येथील वेगळेपण आहे. सर्व प्रवेशद्वारावर ललाटी गणेश पट्या असून दगडी तुळयावर उलटे नाग कोरले आहेत. मंदिराच्या आवारात एक सिंहासन पडलेले आहे. त्यावर गरुडाची मूर्ती कोरली आहे. याचा

Please cite this Article as : *राऊत उध्दव उमाजी , ''वालूरचा ऐतिहासिक वारसाः एक अभ्यास''* **: Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**

अर्थ पूर्वी या मंदिरात विश्णूची मूर्ती कोरली असावी किंवा जवळपास विश्णूचे दुसरे मंदिर असावे पण ते फोडलेल्या अवस्थेत आहे. हे तसे उपेक्षीत मंदिर आहे. मंदिराच्या परिसरात अनेक अवशेश असून तेथे एक मिथून शिल्पाची पट्टी व काही शिवपिंडी बाहेर पडलेल्या आहेत.4 हे मंदिर 13 व्या शतकातील आहे.

नगरेश्वर मंदिर वालूर :

हे जुने हेमाडपंती मंदिर असून गावाच्या अगदी बाहेर आहे. मंदिराचे प्रवेशद्वार पश्चिमाभिमुख असून आज मंदिराची पडझड मोठया प्रमाणात झाली आहे. गर्भगृह व सभामंडपाचा काहीच भाग हेमाडपंती आहे. बाकीचे काम आधुनिक आहे. आवारात शेशशायी विश्णू व इतर काही भग्न अवशेश पडलेले आहेत.

माणकेश्वर मंदिर वालूर :

वालूर येथील माणकेश्वर मंदिरसूध्दा अर्धवट अवस्थेतच आहे. याचा बराच भाग भग्न झालेला आहे. मंदिराचे प्रवेशद्वार पूर्वाभिमुख असून आज स्थितीला फक्त मंदिराचे गर्भगृहच शिल्लक आहे. त्याचा आकार 3'x3' एवढा आहे. त्यात शिवपिंड आहे. मंदिराच्या आवारात अनेक भग्न अवशेश पाहवयास मिळतात. तसेच मंदिराच्या समोरील भागात प्रशस्त स्वरुपाची एक बारव आहे. परंतु, आता ही बारव पूर्णतः पडलेली आहे.

वाल्मिकेश्वर मंदिर वालूर :

वाल्मिकेश्वर ऋशींच्या नावावरुन या गावास 'वालूर' असे नाव पडले. प्राचीन काळापासून वाल्मीकी ऋशींचे हेमाडपंती मंदिर होते. सध्या मात्र हे मंदिर पूर्वीच्या दिमाखात उभे नाही. मुसलमानी अमलात ते फोडले गेले असावे. हे मंदिर सुध्दा गावाच्या बाहेर आहे. आता मंदिराचे आधुनिक पध्दतीने बांधकाम करण्यात आले आहे. मंदिराचे सध्याचे स्वरुप म्हणजे अर्ध्या दगडी, अर्ध्या विटात बांधलेल्या भिंती असलेला सभामंडप, गाभायात शिवपिंडीमागे मुखवटा ठेवलेला आहे. आवारात सप्तमातृकापट्टी, कालभैरव, शेशशायी विश्णू, गरुड व इतर अनेक अवशेश भग्न अवस्थेत पडलेले आहेत. वाल्मीकेश्वर मंदिरात आता अनेक सामाजिक व धार्मिक कार्यक्रम घेण्यात येतात. कारण मंदिराचा परिसर खुप प्रशस्त असून निसर्गरम्य आहे.

कवठेश्वर मंदिर वालूर :

हे छोटे देउळ एका उंचवट्यावर आहे. 6'x6' चा गाभारा, त्यात पुढे शिवपिंड व मागे गणपतीची मूर्ती आहे. लोक याला कवठेश्वर म्हणतात. दोनशे–अडीचशे वर्शापूर्वी जिंतूरचे वतनदार कोठेकर यांनी हे मंदिर बांधले. त्या घराण्यातील काही मंडळी या गावी पूर्वी राहत असत. हे गावही त्यांच्या वतनात समाविष्ट होते.

सिध्दराम बादषहा मठ वालूर :

वालूर या गावी यादवकाळातील मठ आहे. अमरकोशातील व्याख्येनुसार 'मठ' म्हणजे छात्र वगैरेचे निवासस्थान सामान्यतः ब्रम्हचारी, साधू, संन्यासी, भिक्षू इत्यादी प्रकारचे पुरुश व स्त्रिया यांच्या निवासस्थानास मठ म्हटले जाते. 'मोनाथेइन' या ग्रीक शब्दापासून 'मोनॅस्टरी' हा शब्द आला. त्याचा अर्थ एकाकी असणे. एकांतवासात जगापासून अलीप्त राहणे. संस्कृतमधील 'मठ' या धातुपासून हे नाम बनलेले आहे. याऊलट यानामापासूनच तो धातू बनविण्यात आला असेही एक मत आहे. धर्म, संप्रदाय,कालखंड, उद्देश इत्यादी मधील भिन्नतेनूसार मठवासी व्यक्तींचा तेथील निवास तात्पूरता व स्थायी असा दोन्ही प्रकारचा अर्थ असल्याचे आढळते. धार्मिक उपासनेत जीवन व्यतीत करणे, गुढवाद आणि संन्यास यांच्याकडे वळण्याची मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती मठसंस्थेला जन्म देते.5 वालूर येथील मठाची वास्तू भव्य आहे. चार कोपयावर चार बाजूस एक, दिड मी. उंच अधिश्ठानावर ही वास्तू उभी असून राजसत्तेचे प्रतिक म्हणून चारही कोपयावर प्रत्येकी एक असे चार बुरुज आहेत. पूर्वाभिमुख असलेल्या वास्तूंच्या पूर्व बाजूस मुख्य सभामंडप 6.60'x16.00' मी इतका प्रशस्त असून तो 8'x3' अशा 24 स्तंभावर उभा आहे. तर 10.40'x10.40' मी. आकाराचे खुले मैदान आहे. चारही बाजूंनी गुढमंडप पध्दतीने बांधलेली ही वास्तू असून उत्तर व दक्षिण तसेच पश्चिम बाजूस अर्धमंडप ठेवलेला आहे. याची रुंदी 2.75 मी. आहे, तर उत्तर, दक्षिण बाजूस 2 मी. आहे. तीनही बाजूंनी मुख्य वास्तुत प्रवेश करता येतो. वास्तुसाठी असलेले स्तंभ, अधिश्ठान प्रवेशद्वारावरील गणेशपट्टी या बाबी मुळ वास्तू व्याख्यानशाळा अथवा पाठशाळा असल्याचे स्पश्ट करते.

अशा प्रकारचा प्राचीन ऐतिहासिक वारसा या गावास लाभला आहे. परंतू सुरक्षिततेच्या आभावामुळे ऐतिहासिक ठेवा हळूहळू नश्ट होत आहे. या वास्तुकडे वेळीच लक्ष देणे गरजेचे आहे. तरच वास्तू सुरक्षित राहतील.

संदर्भ ग्रंथ

1. वालूर येथील मंदिराचे प्रत्यक्ष सर्वेक्षण.
2. डॉ. कुलकर्णी र.पू.– प्रासादमंडन, महाराश्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई. 2001. पृ.क्र. 29
3. कुलकर्णी एस.बी. – ऐतिहासिक अवशेशात्मक भूतमुगळी, इतिहास संशोधन पत्रिका, 2000, पृ.क्र. 39
4. कुंटे मोरेश्वर, सौ. विजया कुंटे – परभणी–हिंगोली जिल्हा दर्शन, मंदिर कोश प्रकाशन, पुणे. 2000 पृ.क्र. 139
5. डॉ. पाठक अरुणचंद्र – मराठवाडाः एक शोध, सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, 2009 पृ.क्र. 61
6. डॉ. पाठक अरुणचंद्र – उपरोक्त पृ.क्र. 62

Please cite this Article as : *राऊत उध्दव उमाजी , ''वालूरचा ऐतिहासिक वारसाः एक अभ्यास''* **: Indian Streams Research Journal (Feb ; 2012)**